**प्रेस नोट दिनांक ०३/०८/२०१७**

**वाहनचोरी व घरफोडी करणाऱ्यां दोन टोळ्यांना चिंचवड पोलीसांनी केले गजाआड.**

दिनांक ३०/०७/२०१७ रोजी तपास पथकाचे सपोनि कांबळे,पोहवा आटोळे, पोना आवताडे,पोना शेलार,पोशि आखाडे,पोशि गडदे,पोशि मिसाळ व पोशि डोके,असे गस्त करीत असताना वाल्हेकरवाडी भागात दोन इसम एका दुचाकीवरुन वेगाने जाताना दिसले. त्यांचा संशय आल्याने त्यांनी त्यांचा पाठलाग करुन गाड्या आडव्या लावुन थांबवून सदर वाहन चालकास एवढया घाईत कोठे चालला असे विचारता त्यास मराठी समजत नसल्याचे लक्षात आल्याने त्यास हिंदी भाषेत इतने जल्दी कहाँ जा रहे हो असे विचारता त्याने उत्तर न दिल्याने त्यास त्यांचे ताब्यातील गाडीचा नंबर विचारता त्यांस वाहानाचा नंबर सांगता आला नाही व वाहनाचे मालका बाबत माहीती विचारता त्याने उडवा उडवीची व असमाधानकारक उत्तरे दिल्याने सदर वाहनाचा क्रमांक एम एच १४ एन झेड ९९२८ हा मोबाईलवर वाहन या ॲप वर एस.एम.एस केला असता नॉट फाऊंड अशी माहीती प्राप्त झाल्याने ती त्याची नसल्याची खात्री झाल्यानंतर त्यास त्यांचे नाव व पत्ता विचारता त्यांतील वाहन चालकाने त्याचे नाव **१) मोहंमद रजा सेहमसुल्ला चौधरी वय २१ वर्षे रा कुदळवाडी,चिखली पुणे असे व मागे बसलेल्याने त्याचे नाव २) नौशाद अकबरअली शेख वय १९ वर्षे रा मोशीरोड, चिखली पुणे** असे असल्याचे सांगितले सदर वाहन मुळ मालकाचा शोध होणे कामी त्यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे केलेल्या तपासात त्यांनी सदरचे वाहन हे भोसरी भागातुन चोरल्याचे माहीती दिल्याने खात्री करता सदर वाहनाबाबत भोसरी पोलीस ठाणे गुरनं १८९/१७ भा.द.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना गुन्ह्यात ताब्यात घेवुन तपासात त्यांनी इतर ठिकाणी ही मोटार सायकली चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेकडुन एकुण **०९ मोटार सायकली** किंमत अंदाजे **३,४०,०००/- चे** जप्त करुन चिंचवड पो. ठाणे ०४, एमआयडीसी भोसरी ०१,पिंपरी ०१ असे एकुण **०६ गुन्हे** उघडकीस आले आहेत पैकी ०३ मो. सा.चा तपास चालु आहे. तसेच त्यांनी निगडी येथुन किं.रुपये **१५,०००/- रु.चा** एक मोबाईल चोरला असल्याने **निगडीचा ०१** गुन्हा उघडकीस आलेला आहे.

त्याचप्रमाणे दिनांक ३१/०७/२०१७ रोजी पोउनि महाले,पोशि माळी व पोशि बाविस्कर यांना पेट्रोलिंग दरम्यान दगडोबा चौकात दोन इसम संशयीतरित्या मो. सा. वरुन फिरताना दिसल्याने ते पोलीसांना पाहुन पळुन जात असताना त्यांचा पाठलाग करुन त्यांना ताब्यात घेवुन त्यांना त्यांचे नाव विचारता त्यांनी त्यांची नावे **१)सुरेश गोरख जाधव वय २७ वर्षे रा रामनगर, चिंचवड, पुणे २) अविनाश उर्फ राहुल रोहीदास मोहीते वय २७ वर्षे रा सदर** असे सांगितल्याने त्यांना चौकशीकामी घेवुन त्यांचेकडे केलेल्या चौकशीत त्यांनी चिंचवड गुरनं ५०/१७ भादवि कलम ३५४,३८० केला असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करुन तपास केला असता त्यांनी व त्यांचा आणखीण एक साथीदार **३) सागर राम भडकवाड वय २३ वर्षे रा दत्तनगर चिंचवड पुणे** यांनी मिळुन पिंपरी, चिंचवड, भोसरी, निगडी, चाकण अशा विविध भागात घर फोडी, चोरी तसेच वाहन चोरीचे गुन्हे केल्याची माहीती सांगत असल्याने त्यांचेकडुन ०२ मोटार सायकली किं.रुपये ८५,०००/- , चा व ६० ग्रॅम सोन्याचे दागिने ,किं.रुपये १,५३,०००/- तसेच ४४,०००/- रुपये रोख रक्कम व ०७ एल.सी.डी.टीव्ही किंमत रुपये १,०५,०००/- असा **एकुण ३,८७,०००/- रुपयाचा मुद्देमाल हस्तगत** करुन चिंचवड पो. ठाणे कडील घरफोडीचे ०४ गुन्हे, पिंपरी ०२ निगडी ०१ ,चाकण ०२, भोसरी ०१, असे एकुण **१० घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले** आहेत. तसेच ०२ मोटार सायकली हस्तगत

करुन चिंचवड ०१ व भोसरी ०१ असे ०२ वाहन चोरीचे गुन्हे मिळुन एकुण **१२ गुन्हे उघडकीस आलेले** आहेत.सदर आरोपी हे सध्या पोलीस कस्टडीत असुन त्यांचेकडे आणखीन गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे त्या अनुषंगाने अधिक तपास सपोनि सतिश कांबळे हे करीत आहेत.

**वरील दोन्ही टोळ्यांकडुन एकुण ११ मोटार सायकली,६० ग्रॅम सोन्याचे दागीने , ४४,०००/-- रोख रक्कम,०७ एल.सी.डी.टी.व्ही. ०१ मोबाईल असा एकुण ७,४२,०००/-रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करुन एकुण १९ गुन्हे उघडकीस आणले आहेत.**

सदरची कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त सो,उत्तर प्रादेशिक विभाग पुणे, श्री शशिकांत शिंदे, पोलीस उप आयुक्त परि ३, श्री गणेश शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग, श्री राम मांडूरके व वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री विठ्ठल कुबडे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) विनायक साळुंखे यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सतिश कांबळे, पोउनि प्रशांत महाले, पोहवा विलास होनमाने,अशोक आटोळे, पोना स्वप्निल शेलार, सुधाकर आवताडे, चंद्रकांत गडदे,ऋषिकेश पाटील,पोशि मुकेश माळी,शेखर बाविस्कर,राहुल मिसाळ, सचिन वर्णेकर, अमोल माने, गोविंद डोके, पंकज भदाणे, विजयकुमार आखाडे, मपोना रुपाली पुरीगोसावी ,कांचन घवले यांनी कामगिरी केली आहे.



